
UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

वर्ष : ९० • मार्च २०२२ • पुरवणी विशेषांक ०५





Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

ISSN No 2394-5990


६१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता : संदर्भ बहिष्कृत भारतमधील अग्रलेख –
– प्रा.सचिन कांबळे, पुणे ---------- २५१

६२ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार आणि भटक्या विमुक्त जाती जमाती
– प्रा.सचीन साळवे, लोणी-काळभोर, जि.पुणे. ---------- २५७

६३ साहित्यिक जोतीराव फुले – प्रा.संजय साठे, टेंभुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर ---------- २६२

६४ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पाकिस्तान संबंधीचे विचार – प्रा.संतोष कारभारी, पुणे ---------- २६६

६५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातिव्यवस्थेच्या उगमासंबंधीचे विचार
– प्रा.संतोष मरकवाड, एल.बी.पी.एम. कॉलेज, सोलापूर. ---------- २७०

६६ समाजसुधारक महात्मा फुले – प्रा.सरला चव्हाण, करमाळा, जि.सोलापूर ---------- २७५

६७ सामाजिक विषमता व काळाराम मंदिर सत्याग्रह – प्रा.शंकर आवारे, नाशिक ---------- २८२

६८ महात्मा फुलेंचे शेती विषयक विचार – प्रा.बप्पासाहेब शेजूळ, कुर्डूवाडी, जि.सोलापूर ---------- २८६

६९ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीसबलीकरणातील योगदान – डॉ.शिल्पा शेटे, शिरूर, पुणे ---------- २८८

७० महात्मा जोतिबा फुले यांनी हंटर शिक्षण आयोगाला सादर केलेले निवेदन-एक अभ्यास
– डॉ.शिवाजी वाघमोडे, जेऊर, जि.सोलापूर ---------- २९२

७१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार : चलन, शेती, कामगार, उद्योगधंदे
– प्रा.सुभाष शिंदे, वाघोली, जि.पुणे. ---------- २९८

७२ महात्मा फुले यांचे शेतकरी प्रश्नांविषयी विचार
– प्रा.सुनिल राजपूत, अणदूर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद ---------- ३०२

७३ बहिष्कृत हितकारिणी सभा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर – प्रा.सुप्रिया पवार, श्रीगोंदा ---------- ३०६

७४ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री विषयक विचार – प्रा.डॉ.महादेव थोरात, कुर्डुवाडी ---------- ३११

७५ महात्मा फुलेंच्या शिक्षण विषयक विचारांचे महत्त्व – प्रा.डॉ.महादेव थोरात, कुर्डुवाडी. ---------- ३१३

७६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य – डॉ.कल्याण वटाणे, पंढरपूर ---------- ३१५

७७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास
– डॉ.यशवंत साळुंके, दिंडोरी, जि.नाशिक. ---------- ३१७

७८ ज्ञानयोगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर – प्रा.धनंजय मोगले, सोलापूर ---------- ३२१

७९ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मपरिवर्तन : एक ऐतिहासिक अवलोकन– प्रा.सुमन केंद्रे, पंढरपूर ३२५

८० डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा समताधिष्ठित समाजनिर्मितीचा लढा
– प्रा.समाधान लोंढे, बार्शी, जि.सोलापूर. ---------- ३२८

८१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली लोकशाही आणि सद्यस्थिती
– डॉ.शारदा कदम, वसमत, जि.हिंगोली. ---------- ३३१

८२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी सुधारणावादी विचार: सध्यस्थितीची गरज
– १. डॉ. दत्तात्रय निवृत्तीराव घोडके, पुणे २. प्रा.चारुता प्रताप वगरे, कोल्हापूर ---------- ३३३

८४ Mahatma Phule: A Charismatic Writer of the Masses of Modern India
– Dr.Anand Hipparkar, Karjat, Dist. Ahmednagar ---------- ३३७

८४ Ambedkar and Dalit Women: The Long-Lasting Legacy of His Discourse on Women Empowerment - Dr.Anisha Shrivastava, Gaziabad, UP ---------- ३४२




Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad
Scanned with CamScanner

# महात्मा फुले यांचे शेतकरी प्रश्नांविषयी विचार

प्रा. सुनिल दत्त. रजपूत
सहयोगी प्राध्यापक,
जवाहर क., वि. व वा. महाविद्यालय, अणदूर, ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद-४१३६०३
Email ID : rajputsunil90?@yahoo.com Cell No. 9960404956

सारांश :

महात्मा फुले मराठी लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवुन पुरोगामी विचारांची मांडणी केली. 'शेतकऱ्याचा आसूड' हा महात्मा फुले यांचा प्रसिद्ध ग्रंथ होय. तत्कालीन समाजातील जातीभेद, अनिष्ट प्रथा तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी याविरुद्धची प्रतिक्रिया महात्मा फुले यांच्या साहित्यातून उमटलेली होती. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये महात्मा फुले हे खऱ्या अर्थाने शेती प्रश्नाचे पितामह आहेत.

महात्मा जोतिराव फुलेंनी फक्त महाराष्ट्रालाच नाही तर देशाला समाजाकडे बघायचा नवा दृष्टीकोन दिला. कारण ते समाजाकडे शुद्रातिशुद्रांच्या नजरेतून पाहत होते. म्हणजेच ते समाजाच्या खालच्या स्तरातून पाहत होते.

शेती आणि शेतकरी यांच्या प्रश्नाविषयी जोतिरावांना विशेष आस्था होती. ब्रिटिश राज्यात शेतकऱ्यांना शेतीवरच अवलंबून राहावे लागत होते. दुष्काळ, अज्ञान, अंधश्रध्दा, शेतसारा वसुली या सगळ्यात शेतकऱ्यांची दैना झाली. शेतकऱ्यांची ही कैफियत जोतिरावांनी शेतकऱ्याचा आसूड या पुस्तकातून मांडली.

महात्मा जोतिरावांच्या शेतकऱ्यांच्या भूमिकेचा इंग्रज सरकारलाही विचार करावा लागला. शेती, शेतकरी, शिक्षण या संदर्भात जोतिरावांनी सातत्याने सरकारला सुचना केल्या.

* की वर्डस – शेती, शेतकरी, शेतमजूर आणि शेतकऱ्यांचे प्रश्न.

*** प्रस्तावना :**

महात्मा जोतिराव फुले यांनी त्यांच्या काळात जे विचार मांडले ते विचार आज आपणास महत्वाचे वाटतात. महात्मा फुले हे द्रष्टे विचारवंत होते. अनेक बाबतीत ते काळाच्या फार पुढे होते. शेती प्रश्नावर त्यांनी अतिशय मोलाचे विचार मांडलेले आहेत. त्यांच्या काळातील शेती विषयक निर्माण झालेले अनेक प्रश्न आज जास्त तीव्र स्वरुपात उभे राहिले आहेत. श्रम करणाऱ्या शेतकऱ्यास त्याच्या श्रमाचा मोबदला देण्याचा आणि लोकांची धर्म आणि संस्कृती यांच्यामुळे निर्माण झालेली गुलामगिरी नष्ट करण्याचा प्रश्न आजही महत्वाचा आहे. हे प्रश्न आजही कायम असल्यामुळे ते जिकिरीचे बनत चालले आहेत. म्हणून फुले यांच्या विचारांच्या प्रकाशात हे प्रश्न समजावून घ्यावे लागतात.

*** शोध निबंधाचा उद्देश :**

महात्मा जोतिबा फुले यांनी त्या काळात मांडलेले शेतकऱ्यांचे प्रश्न आजही पूर्णांशाने सुटलेले नाहीत. आज शेतकऱ्यांचा प्रश्न निकराचा बनलेला आहे. शेतकऱ्यांतही वर्गीय स्तर पडले आहेत. त्यातील काही गट स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या सर्वांचा शेतकरी चळवळीवर झालेला परिणाम सदर शोध निबंधातून शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१) महात्मा जोतीबा फुले यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केलेल्या विधायक कामाची माहिती मिळविणे.
२) महात्मा जोतीबा फुले यांच्या कार्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात झालेला बदल शोधणे.
३) महात्मा फुले यांच्या शेतकरी प्रश्नांची माहिती करुन घेणे.
४) महात्मा फुले यांचे शेतकरी प्रश्न हे सामाजिक प्रश्न असून या शेतकरी प्रश्नांचा अभ्यास करणे.

*** गृहीतके :**

१) सामाजिक व आर्थिक क्षेत्रांमध्ये परिवर्तन करण्यासाठी महात्मा फुले यांचा विचार मोलाचा आहे.
२) शेतकरी प्रश्न विषयक महात्मा फुले यांनी मांडलेले विचार फार महत्त्वपूर्ण आहेत.
३) महात्मा फुले यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून कार्य करणे गरजेचे आहे. सर्व शेतकऱ्यांच्या/मानवाच्या कल्याणासाठी या विचारांची आवश्यकता आहे.

*** माहितीचे संकलन व विश्लेषण :**

महात्मा जोतीबा फुले अभ्यासताना त्या काळातील ऐतिहासिक नोंदी, घडलेल्या घडामोडी यांची माहिती विविध साधनांद्वारे प्राप्त केलेली आहे. महात्मा फुले यांचा गौरव ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके इ. दुय्यम साधनांचा



Scanned with CamScanner
Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

अवलंब केलेला आहे.



## ❖ विषय विवेचन :

महात्मा जोतीबा फुले यांच्या काळात महाराष्ट्रात शेतकरी सरंजामशाही, सावकारशाही आणि साम्राज्यशाही यांनी नाडलेला होता. त्या काळात इंग्रज साम्राज्यशाहीने शेतकऱ्यांची पूर्ण नागवणूक केली होती.

शेतकऱ्यांचा प्रश्न अनेक वर्षांपासून मानव समुहास पडलेला असून या वर्गाच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातात. या बळीराजाला सुखी करण्यासाठी काय केले पाहिजे? या विषयी उहापोह केला जातो. प्राचीन काळापासून अर्वाचीन काळात अनेक प्रयत्न करण्यात आले. १९ व्या शतकात देखील शेतकऱ्यांना दुष्काळ, पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तीबरोबरच कर्जबाजारीपणा, सावकारी शोषण यांना तोंड द्यावे लागले.

भारतात या काळात अनेक समाजसुधारक उदयास आले. पण समाजसुधारकांच्या अग्रणी ठरलेल्या महात्मा फुलेंनी या प्रश्नाकडे विशेष लक्ष वेधले. काळाच्या पुढे असलेल्या फुलेंनी शेती प्रश्नाविषयी मांडलेले विचार तितकेच महत्त्वाचे ठरतात[१] शेतकऱ्यांच्या अठराविश्व दारिद्र्याचे अत्यंत प्रत्यकारक वर्णन महात्मा फुले यांनी केले होते. ते लिहतात–

काया पुरती लंगोटी । फिरती नांगराचे पाठी।।
एक घोंगड्यावाचूनी। स्त्रिया नसे दुजे शयनी।।
ढोरामागे सर्वकाळ। पोरे फिरती रानोमाळ।।
ताक कण्या पोटभरी। पडे तीन शेंड्या गाठ्ी।।
कर्जरोखी लिहिले आट्। निर्दय मरवाडी काट्।।
अज्ञान्याला समजत नाही। कुलकर्ण्याने लिहिले काही।।
वकिलाची महागाई। न्यायाधीशा दया नाही।।
पाप पुण्य जेथे नाही। पैशापुरते दादाभाई।।

महात्मा फुले यांनी 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकांतून अनेक प्रश्न चर्चिले आहेत. त्यांच्या मते शेतकरी हा केवळ सरकारी धोरण किंवा दुष्काळामुळे नागवला गेला नाही तर त्याचे सर्व अंगाने शोषण होत आहे.

भारत हा शेतीप्रधान देश आहे. आणि या शेतीप्रधान देशामधील शेतकऱ्यांच्या व शेतीच्या अवनत स्थितीचे विदारक चित्र रेखाटून त्या अवनत स्थितींची मुलगामी मिमांसा महात्मा फुले यांनी त्या काळात आपल्या भाषणातून व आपल्या लेखणीतून मांडली व जी आजही २१ व्या शतकात भारतासाठी मार्गदर्शक ठरते.[२]

महात्मा फुले यांची ध्येयदृष्टी लोकसत्ताक राज्य, कष्टकऱ्यांचे लोकशाही स्थापन करणे ही होती. धर्म संस्कृती, राजकारण, जाती निर्मूलन, शिक्षण, शेती हे प्रश्न एकमेकांशी निगडीत आहेत शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी या क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन त्यांनी महत्त्वाचे मानले.

१९ व्या शतकातील सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा कृषीवर खूपच प्रभाव पडलेला होता. मराठेशाहीतील शेतीव्यवस्था ही सरंजामशाही शेतीव्यवस्था होती. सरंजामशाही ही प्रत्येक बाबतीत भांडवलशाहीपेक्षा कमकुवत असते. पेशवाईत बाजीरावाच्या काळात शेतकऱ्यांवर अत्याचार वाढतच होते. जातीव्यवस्था, पंचायत संस्था, बलुतेदारी व पाटील यांनी सरंजामशाही व्यवस्थेस भक्कम आधार दिला होता.

इंग्रजांचे राज्य महाराष्ट्रात स्थापन झाल्यानंतर इंग्रजांनी शेतीक्षेत्रात बदल घडवून आणायला सुरुवात केली. परंतु हे बदल फारच संथ गतीने झाले. पण यात शेतकऱ्यांपेक्षा सरकारचाच फायदा अधिक झाला. कायमधारा, महालवारी, रयतवारी या पद्धती सुरु झाल्या. प्रिंगल सारख्या ब्रिटीश अधिकाऱ्यांने देखील शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले.[३]

सुरुवातीच्या काळात महात्मा फुले यांनी शिक्षण व समाजसुधारणेकडे लक्ष दिले. पुढे त्यांनी दगड पुरविण्याचे कंत्राट घेतले आणि त्यांना शेतकरी व कामगार यांच्या शोषणाची व सरकारी नोकर आणि युरोपीय अधिकारी यांची जाणीव झाली. शेतकऱ्यांचा प्रश्न महत्त्वाचा समजून भाषणे देण्यास सुरुवात केली. निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. इ.स. १९८७ मध्ये दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांसाठी बालकाश्रम काढण्यात आला. खडकवासला कालवा झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात शेतकरी पाण्याचा व्यवस्थित वापर करीत नव्हते. पण त्यांना शेती कशी करावी हे समजावून सांगण्यासाठी त्या भागात स्वत: जोतीबांनी जमीन घेऊन नव्या पद्धतीने शेती करुन दाखविली.[४]

इ.स. १८८३ साली शेतकऱ्याचा आसूड हा ग्रंथ लिहून शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी जोतीबांनी गावोगावी सभा घेतल्या. इ.स. १८८२ साली जोतीबांनी मुंबईत हिंदी शेतकऱ्यांची स्थिती या विषयावर व्याख्यान दिले. या काळात शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथाचे गावोगावी सार्वजनिक वाचन झाले. जुन्नर व आसपासच्या भागातही त्यांनी शेतकऱ्यांचे दैन्य, गुलामगिरी, शिक्षण क्षेत्रातील मागासलेपण यावर त्यांनी झोड उठविली. या सर्व चळवळीचा परिणाम म्हणून इ.स. १८८५ साली जुन्नर भागात शेतकऱ्यांचा असंतोष वाढला. शेवटी बहिष्काराचे हत्यार वापरुन व्याजाचा





Scanned with CamScanner

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

व जमिनीचा दर कमी करण्यात यश आले.[९] इ.स. १८८४ साली जोतीबा बडोद्याला गेले आणि तेथे त्यांनी शेतीसुधारणा या विषयावर व्याख्यान दिली. त्यांनी सयाजीराव गायकवाड यांना अक्षरशून्य शूद्रांचे हितचिंतक व्हा अशी विनंती केली. त्यानंतर संस्थानातील ब्राम्हणांना फोकत खिचडी (डाळ व तांदूळ) देण्याची प्रथा त्यांनी बंद केली. हरी रावजी चिपळूणकर यांनी ड्युक ऑफ कॅनाट मेजवानीसाठी आमंत्रित केले. जोतीबांनाही त्याचे निमंत्रण होते. या समारंभात ते शेतकऱ्यांच्या वेशात आले. कारण खरा भारत कसा आहे, शेतकरी कसे जीणे जगतो याचे प्रत्यंतर त्यास द्यावयाचे होते.

शेतकऱ्यांचे कल्याण कसे करावे हाच ध्यास त्यांना लागलेला होता. इ.स. १८८७ साली काढलेल्या एका चित्रात त्यांनी भारतीय समाजाची सर्वधारी व सुधारणेची नंबरवारी दाखवून शेतकरी अशक्त, थकलेला आणि भांबावलेला दाखविला आहे.[१] हे चित्र आज उपलब्ध नाही. पण या प्रश्नावर कशा पद्धतीने विचार करीत होते. हे यावरुन दिसून येते.

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचा प्रश्न केवळ आर्थिक दृष्टिकोनातून तपासला नाही. तर सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक बाजूने ही तपासून पाहिला. शेतकऱ्याला जोपर्यंत आत्मस्थितीचे ज्ञान होत नाही, तोपर्यंत त्यांचे शोषण चालूच राहणार आहे. म्हणून त्यांनी शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. महात्मा फुले यांची ध्येयदृष्टी शासन व शोषण यापासून मुक्त असे बळीचे राज्य आणण्याची होती. त्यास ते कधी निर्मिकाचे राज्य असे ही म्हणत.

'शेतकऱ्याचा आसूड' आणि 'ब्राम्हणाचे कसब' या दोन्ही पुस्तकांत त्यांनी ब्राम्हण शेतकऱ्यांचे धार्मिक शोषण कसे करतात याचे मार्मिक विवेचन केले आहे. धार्मिक शोषणाबरोबर शेतकऱ्यांच्या सांस्कृतिक शोषणावर त्यांनी प्रकाश टाकलेला आहे. धार्मिक शोषणापासून शेतकऱ्यांचे सांस्कृतिक शोषण होते. कारण त्यांचे धार्मिक शोषण त्यांच्या अज्ञानामुळे होते. शूद्रांच्या गुलामगिरीचे मुख्य कारण म्हणजे अज्ञान. अज्ञानामुळे शेतकऱ्यांना उपजत मानवी अधिकाराचा उपभोग घेता येत नाही. याविषयी त्यांनी खंत व्यक्त केलेली आढळते.

शेतकऱ्यांची सांस्कृतिक गुलामगिरीतून सुटका करावयाची असेल तर त्यांना आधुनिक शिक्षण दिले पाहिजे आणि बळीस्थानचा खरा इतिहास समजावून सांगितला पाहिजे असे म.फुले यांचे मत होते. शेतकऱ्यांनी शहाणे रहावे, शिकावे आणि सत्यधर्माचे तत्त्वज्ञान आचरणात आणावे असे म.फुलेंचे मत होते.

सावकार वर्ग ही शेतकऱ्यांच्या शोषणात आघाडीवर होता. सावकारांची पिळवणूक शेतकऱ्यांचे जीवन उध्वस्त करून टाकते. इंग्रज काळात सावकार वर्ग वाढला व शेतकरी कर्जबाजारी झाला. अज्ञान व देवभोळेपणाचा फायदा घेण्यात आला.

तसेच सावकारांशी हातमिळवणी करून ब्राम्हण नोकरशाही सर्व अंगाने शेतकऱ्यांची पिळवणूक करते. म्हणून म.फुले म्हणतात –

मोठमोठे दुकानदार सारे भटच अंमलदार।।
गरीब शूद्रांवर कहर हे पहा करती जोजा।।
असे आंधळे सरकार।।

त्या काळात युरोपीय व एतद्देशीय नोकरशाही अशा दोन प्रकारची नोकरशाही होती. साक्षरतेचा फायदा घेऊन शेतकऱ्यास त्रास देत असत. खोटे रिपोर्ट, खोट्या सह्या, साक्षी तयार करुन शेतकऱ्यांचे नुकसान करत असत. त्यांना म.फुले कलम कसाई व ग्रामराक्षस असे संबोधतात. शेतकऱ्यांच्या घामाचा पैसा सरकार वापरत असून देखील शेतकऱ्याला मात्र दारिद्र्यात खितपत पडावे लागले.

शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची अनेक कारणे आहेत. म.फुले यांचे मते शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली हे आहे. या लोकसंख्या वाढीचे पहिले महत्त्वाचे कारण म्हणजे गेल्या ५०–६० वर्षात मोठी युद्धे न झाल्यामुळे खानेसुमारी मोठ्या प्रमाणात वाढली. त्या लोकसंख्येला इतर कामे नसल्याने त्यांचा बोजा शेतकऱ्यावर पडला. अनेक संस्थाने लयास गेली. परिणामी लष्कर, खाजगी दप्तरात असलेले लोक बेकार झाले व शेतकरी वर्ग वाढतच गेला.

*** निष्कर्ष :**

१) भारतात उदयास आलेल्या अनेक समाजसुधारकांपैकी महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचे प्रश्नाकडे विशेष लक्ष वेधले.

२) महात्मा फुलेंचे शेतीप्रश्नाविषयी मांडलेले विचार अत्यंत महत्त्वाचे वाटतात.

३) गुलामगिरी, शेतकऱ्याचा आसूड या पुस्तकातून शेतकरी व शेतीसंबंधी अनेक प्रश्न चर्चिले आहेत.

४) म.फुले यांची ध्येयदृष्टी लोकसत्ताक राज्य, लोकशाही स्थापन करणे ही होती.



Scanned with CamScanner
Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

५) म. फुलेंवर १९ व्या शतकातील सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा खूपच प्रभाव पडलेला दिसून येतो.

६) शेतकऱ्यांचे दैन्य, गुलामगिरी, शिक्षण क्षेत्रातील मागासलेपण यावर म.फुलेंनी प्रकाश टाकला.

७) म.फुले यांनी जनजागृती करण्यासाठी गावोगावी सभा घेऊन शेतकऱ्यांमध्ये चैतन्य निर्माण केले.

८) म.फुले यांनी शेतकऱ्यांचा प्रश्न केवळ आर्थिक दृष्टीकोनातून न तपासता सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक बाजूने ही तपासून पाहिला.

थोडक्यात शेतीसंबंधी आपली भूमिका विशद करताना शेतकऱ्यांचे दैन्य, दारिद्र्य व वाढता कर्जबाजारीपणा यास तत्कालीन ब्राम्हणशाही, नोकरशाही व सावकारशाही यांच्याकडून आर्थिक शोषण होत असल्याचे मत म.फुले यांनी मांडले. शेतकरी व शेतीविषयी म.फुले यांनी खूप सूक्ष्म विवेचन केले आहे. शेतकरी व शेतमजूर का व कसा नाडला जातो? हे महात्मा फुले यांनी सांगितले आहे. शेतकऱ्यांच्या दैनावस्थेस कारणीभूत असलेले घटक शोधून त्यावर उपाययोजना सुचविल्या. शेतकऱ्यांसाठी सुधारणा राबविल्या. पाणी आडवा पाणी जिरवा ही उद्घोषणा म.फुलेंचीच, म.फुले दृष्टे विचारवंत होते, पण त्यांनी मांडलेले प्रश्न तसेच आहेत. शोषणाचे प्रकार, शोषणकर्ते तसेच आहेत. शेती, पाणी, पाणी व्यवस्थापन, पर्यावरण, सावकारशाहीशी सामाजोडी हे प्रश्न कायम आहेत. म्हणून शोषणाविरुद्ध आवाज उठविणे गरजेचे असून महात्मा फुले यांचे विचार यासाठी मार्गदर्शक आहेत.

* संदर्भसूची :


१) Kumar R. Western India in 19th Century. Routledge and Kegar Paul, London 1968/7/100/101

२) रघुवंशी रमेश, महात्मा फुले लिखित शेतकऱ्यांचा आसूड आणि इशारा, रघुवंशी प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ४.

३) धनंजय कीर, महात्मा जोतीराव फुले आजच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६८, पृ. १७८.

४) धनंजय कीर, महात्मा जोतीराव फुले आजच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६८, पृ. १७९.

५) चौसाळकर अशोक, महात्मा फुले यांचे लोकशाहीविषयक विचार, पृ. २८-२९.

६) पाटील पंढरीनाथ, महात्मा जोतीराव फुले (दुसरी आवृत्ती), मनोविकास प्रकाशन, मुंबई १९८९, पृ.१२४.


●●●

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad



Scanned with CamScanner